## फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १३३/१८ मधील नि.४ वरील आदेश

अर्जदार क्र. १ ते ३ यांनी सदरचा अर्ज अर्जदार यांना दरमहा रक्कम रु. ५,०००/- प्रत्येकी अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

### थोडक्यात वस्तुस्थिती अशी आहे की,

२. अर्जदारांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे पोटगी मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे व त्या अर्जामध्ये अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र.१ व जाबदेणार यांचा विवाह दि. २०.०२.२००७ रोजी संपन्न झाला. अर्जदार क्र.२ व ३ या अर्जदार क्र.१ व जाबदेणार यांच्या मुली आहेत. लग्नानंतर अर्जदार क्र.१ जाबदेणाराकडे नांदावयास गेली. अर्जदार ही घरातील सर्व कामे करित असे. जाबदेणाराच्या आईने अर्जदाराला नोकरी करण्यासाठी दबाव टाकला. तसेच ती तिला तु घरातील मोलकरीन आहेस असे टोमणे मारत होती. जाबदेणा-याची आई अर्जदाराला मारहाण करत होती. तसेच नातेवाईकांसमोर अपमान करत होती. जाबदेणार याला दारुचे व्यसन होते. तसेच तो जुगार देखिल खेळत होता. त्याने अर्जदाराला कोणतीही आर्थीक मदत केली नाही. अर्जदार जेव्हा गरोदर राहिली तेव्हा गैरअर्जदार अर्जदाराला औषधे तसेच अन्नपाण्याची व्यवस्था करत नव्हते. त्याने अर्जदाराला बाळंतपणासाठी बाहेर पाठविले. दिनांक ११/१२/२००७ व दिनांक ३१/०७/२०११ रोजी अर्जदाराला अपत्य प्राप्त झाले. अर्जदार हिला दुसरी मुलगी झाल्यावर गैरअर्जदार व त्याच्या घरातील कोणीही तिला बघण्यास आले नाही. तसेच तिला मुल झाले नाही म्हणुण जाबदेणाराची आई अर्जदाराला टोमणे मारत असत. सासरी गेल्यावर जाबदेणार व त्याच्या आईने अर्जदाराचा मानसिक व शारिरीक छळ सुरुच ठेवला. जाबदेणार याने अर्जदार व दोन्ही मुलींना घराबाहेर हाकलुन दिले. त्यानंतर ती रनाळा येथे तिच्या आईवडीलांबरोबर राहु लागली. त्यानंतर परत ती सासरी गेली तेव्हा जाबदेणार याने तिला काही दिवस व्यवस्थित नांदविले. त्यानंतर व्यवसाय करण्यासाठी माहेरुन दोन लाख रुपये घेवुन ये असे म्हणुन तिला त्रास देण्यास सुरुवात केली. त्यामुळे दिनांक २४/०२/२०१८ पासुन अर्जदार ही तिच्या आईवडीलांबरोबर राहत आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांना अर्जदार क्रमांक १ हिच्या

वडीलांवर अवलंबुन रहावे लागत असुन त्यांना कोणताही कामधंदा नाही व कोणतेही उत्पन्नासाठी साधन नाही. अर्जदाराचे आई-वडील वयोवृद्ध आहेत. जाबदेणार याने अर्जदारांच्या अन्न, वस्त्र, निवारा अथवा औषधपाणी याची सोय केली नाही.

**३.** उलटपक्षी जाबदेणार हा सनफलॅग कंपनीमध्ये नोकरी करतो व प्रतिमहिणा रक्कम रु. ५००००/- कमवितो. जाबदेणार याची शेत जमिन आहे. तसेच इतर घरे देखिल आहेत जी त्यान भाडेतत्वावर दिली आहेत. जाबदेणार याला शेत जमिनीतुन वार्षिक विस लाख रुपये उत्पन्न येते व भाडयातुन प्रतिमहा रक्कम रु. ३०,०००/- मिळतात. त्याच्यावर अर्जदारांशिवाय कोणाचीही जबाबदारी नाही. जाबदेणार याने अर्जदारांचा त्याग केल्यापासुन अर्जदारांच्या पालनपोषणाची जबाबदारी पार पाडलेली नाही. त्यामुळे अर्जदाराने सदरचा अंतरिम पोटगीचा अर्ज केला आहे.

**<u>जाबदेणाराचे म्हणणे :</u>**

**४.** जाबदेणाराने नि.८ अंतर्गत लेखी म्हणणे सादर केलेले आहे व अर्जदाराने केलेली सर्व कथने नाकारलेली आहेत व असे कथन केले आहे की, अर्जदाराने जाबदेणार यांच्यावर खोटे आरोप केलेले आहे. जाबदेणार याच्या घरातील इतर लोक हे वेगवेगळया ठिकाणी राहतात. त्यामुळे त्यांनी अर्जदाराला त्रास देण्याचा प्रश्नच उद्धभवत नाही. त्यांनी अर्जदाराचा नेहमी आदर केलेला आहे. अर्जदार ही अहंकारी तसेच भांडखोर वृत्तीची आहे. जाबदेणार याने अर्जदाराला तिचे शिक्षण घेण्यास आर्थीक मदत केली. जाबदेणार हा काहीही कामधंदा करत नाही. याउलट अर्जदार ही नोकरी करुन प्रतिमहा रक्कम रु. २०,०००/- कमविते. गेल्या ३५ ते ४० जाबदेणार याचे आई-वडील त्याचेजवळ राहत नाही. तसेच इतर कुटुंबातील लोकसुद्धा त्याच्याजवळ राहत नाही. जाबदेणार याने अर्जदाराला नोकरीदेखिल लाउन दिली. त्याने अर्जदारांना कधीही वाईट वागणुक दिली नाही. त्यामुळे त्याने सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**५.** फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळणेसाठी अर्जदार क्र.१ ते ३ हे स्वत:चा सांभाळ करू शकत नाही व जाबदेणाराने त्यांचा कोणत्याही योग्य व संयुक्तिक कारणाशिवाय त्याग केला आहे हे प्रथमदर्शनी दाखविणे महत्वाचे आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ चा उद्देश हा विवाहीत स्त्री, मुले व आई वडील यांच्या जीवनावश्यक वस्तुंच्या गरजा भागाव्यात व त्यांना त्वरीत दिलासा मिळावा म्हणुन सदरची तरतुद करण्यात आलेली आहे व त्याची जबाबदारी जो व्यक्ती समर्थ असुन देखील त्या गरजा भागवत नाही त्याच्यावर देण्यात आलेली आहे.

**६.** अर्जदाराचे वकिलांनी असा युक्तीवाद केला की, जाबदेणार याने अर्जदाराने अर्ज दाखल करण्यापुर्वी अर्जदाराचा त्याग केलेला आहे व अर्जदाराने नांदावयाचा प्रयत्न करून सुध्दा जाबदेणाराने अर्जदारास नांदविले नाही. त्यामुळे जाबदेणाराने अर्जदाराचा त्याग केलेला आहे असे प्रथमदर्शनी दाखविले आहे. म्हणुन अर्जदारास पोटगी देणेची मागणी केली. उलटपक्षी जाबदेणार याने त्याच्या म्हणण्यामध्ये असे म्हटले आहे की, अर्जदार स्वत:हुन घर सोडुन गेलेली आहे. तो अर्जदारांना सांभाळण्यास तयार आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**७.** अर्जदार व जाबदेणार यांचा विवाह झालेला आहे व त्यांना दोन मुली आहेत ही बाब जाबदेणार यांना मान्य आहे. अर्जदार व जाबदेणार यांचा विवाह झाल्यापासुन अर्जदाराने जाबदेणार बरोबर संसार केला. अर्जदाराने अर्जासोबत तिचे शपथपत्र दाखल केलेले आहे व जाबदेणाराने तिचा त्याग केलेबाबत कथन केलेले आहे. तसेच अर्जदार हिने स्वत:ला उत्पन्नाचे साधन नसलेबाबत कथन केले आहे. तसेच अर्जदाराने सामनेवाल्याने तिला हाकलुन दिल्याबाबत कथन केलेले आहे. कोणतीही स्त्री लग्न झाल्यानंतर काही वर्ष झाल्यानंतर तसेच अपत्य झाल्यानंतर विनाकारण जाबदेणाराचा त्याग करेल असे प्रथमदर्शनी वाटत नाही. जाबदेणाराने अर्जदारावर गैर विश्वास ठेवावा असा प्रथमदर्शनी कोणताही पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. अर्जदाराने जाबदेणारास उत्पन्न असलेबाबतचे कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. परंतु अर्जदार क्र.१ ते ३ यांची जबाबदारी ही जाबदेणार

यांचे वर आहे. तो ती जबाबदारी नाकारू शकत नाही. अर्जदारांना सांभाळाची जबाबदारी त्याच्यावर आहे. परंतु जाबदेणार याचे म्हणणे पाहता जाबदाराने अर्जदारास सांभाळण्याची जबाबदारी पार पाडल्याचे दिसुन येत नाही. सदर वस्तुस्थिती पाहता जाबदेणार याने अर्जदार यांचे उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही ही बाब प्रथमदर्शनी स्पष्ट होते. अर्जदार ही स्वत: चा तसेच अर्जदार क.२ व ३ यांचा सांभाळ स्वत: करू शकत नाही हे प्रथमदर्शनी सिध्द केलेले आहे. जाबदेणार याने अर्जदार ही नोकरी करत असल्याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. जाबदेणार हा अर्जदारांना सांभाळण्यास समर्थ असताना सुध्दा त्याने अर्जदारांना सांभाळलेले नाही ही बाब अर्जदाराने प्रथमदर्शनी सिध्द केलेली आहे. त्यामुळे जाबदेणार याने अर्जदार क.१ हिस रू. १०००/- व अर्जदार क.२ व ३ यास प्रत्येकी रू. ५००/- इतकी पोटगी देणे उचित होईल असे मला वाटते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. जाबदेणार याने अर्जदार क.१ हिस प्रतिमहा रू. १०००/- (रूपये एक हजार फक्त) व अर्जदार क.२ ते ३ यास दरमहा प्रत्येकी ५००/- (रूपये पाचशे पन्नास फक्त) इतकी पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन दयावी.

२. या अर्जाचा खर्च वादाच्या अनुषंगाने आकारण्यात येईल.

Siddharth Babaji Somnath Gadve
Digitally signed by Siddharth Babaji Somnath Gadve
Date: 2019.11.29 13:34:01 +0530

दिनांक : २७/११/२०१९

(एस. एस. गाडवे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.२, कामठी.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. File of Judgment are word to word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Rajesh Jaidevji Khobragade,<br>Attached to Jt. CJJD & JMFC,<br>Kamptee. |